दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१९३ बुधवार,दि.१९ मार्च २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-193 | Wednesday, Dt.19 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## विधान परिषद पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे:६ पैकी ५ जणांचे अर्ज वैध
# अपक्ष उमेदवाराचा अर्ज झाला बाद; २७ मार्चला मतदान

प्रतिनिधी । मुंबई

विधान परिषदेसाठी रिक्त पाच जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. २७ मार्च रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत सोमवारपर्यंत होती. निवडणुकीसाठी ६ जणांचे अर्ज आले होते. मंगळवारी अर्जांची छाननी करण्यात आली. यामध्ये एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. त्यामुळे विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध होणार असल्याची चिन्हे आहेत.

विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांनी तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके यांनी अर्ज दाखल केला होता. यासोबतच एका अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल केला होता. मात्र, अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. अपक्ष उमेदवाराकडे आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी नसल्याने अर्ज बाद झाला. अर्ज मागे घेण्याची तारीख २० मार्च आहे. अशात निवडणूक अधिकारी २० तारखेनंतर बिनविरोध संदर्भात अधिकृत घोषणा करणार आहेत.



### महाराष्ट्राच्या विधान परिषदेची रचना

महाराष्ट्राच्या विधान परिषदेची सदस्यसंख्या ७८ इतकी आहे. विधानसभेप्रमाणे विधान परिषद दर ५ वर्षांनी भंग होत नाही. विधान परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो. ७८ सदस्यांपैकी ३० सदस्य विधानसभेच्या आमदारांकडून निवडले जातात. २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींकडून मतदानाद्वारे निवडून दिले जातात. तर, शिक्षकांमधून ७ आमदार, पदवीधरांमधून ७ आमदार निवडले जातात. तर, राज्यपाल साहित्य, कला, सहकार आणि सामाजिक सेवा यातून १२ आमदारांची नियुक्ती करतात.

महाविकास आघाडीने उमेदवार दिला नाही

दरम्यान, विधान परिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली तरी विरोधी पक्षांनी मात्र उमेदवार दिलेला नाही. कारण

(उर्वरीत पान २ वर)

## नागपूर दंगलीवर मुख्यमंत्र्यांचे निवेदन:धार्मिक मजकूर जाळल्याच्या अफवेने हिंसाचार झाला
## 'छावा'चा दाखला देत औरंगजेबावर भाष्य



प्रतिनिधी । मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत नागपूर दंगलीवर विस्तृत भाष्य केले. त्यात त्यांनी जनतेला एकमेकांप्रती आदरभाव बाळगून संयम राखण्याचे आवाहन केले. तसेच कुणी दंगल करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा जात, धर्म न पाहता कडक कारवाई करण्याचा इशाराही दिला. विशेषतः पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सरकार सोडणार नसल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३० वा. नागपुरातील महाल परिसरात विहिंप व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी 'औरंगजेबाची कबर हटाव' असे आंदोलन केले. हे आंदोलन करताना त्यांनी गवताच्या पेंड्या असलेली प्रतिकात्मक कबर जाळली. त्यानंतर

(उर्वरीत पान २ वर)

## बीडच्या धनंजय नागरगोजे प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई
### विक्रम मुंडे, अतुल मुंडेंवर गुन्हा दाखल



प्रतिनिधी । बीड

बीडच्या आश्रमशाळेतील शिक्षक धनंजय नागरगोजे यांच्या आत्महत्या प्रकरणाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. फेसबुकवर पोस्ट लिहून आत्महत्या केलेल्या शिक्षक नागरगोजे यांच्या आत्महत्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संस्थेचे अध्यक्ष विक्रम मुंडे, सचिव अतुल मुंडे व इतरांवर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी अठरा वर्ष पगार मिळाला नाही म्हणून संस्था चालकासह इतर काही जणांचे नाव सुसाईड नोटमध्ये लिहून आत्महत्या केली होती.

दरम्यान, या प्रकरणात कोणताही गुन्हा दाखल झाला नव्हता. विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीडमधील आत्महत्याप्रकरणावरुन सरकारला सवाल केला आहे. तसेच, याप्रकरणी अद्यापही संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल नाही, असा जाब दानवे यांनी विचारला. परिणामी विधान परिषदेत देखील याचे पडसाद उमटताच बीड मधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आता गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

शिक्षक आत्महत्या प्रकरणात गुन्हा दाखल करून घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

(उर्वरीत पान २ वर)

## शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवून
### जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधणार - जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

प्रतिनिधी । बीड

शिवसेनाप्रमुखांवर नितांत श्रद्धा आणि त्यांच्या विचारांशी एकनिष्ठ असणारा शिवसैनिक आजही प्रत्येक गावात आणि घराघरात आहे. बीड जिल्हा सुद्धा याला अपवाद नाही. वीस वर्षापासून एकही आमदार आणि खासदार पक्षाचा नसतानाही आणि अनेकांनी गद्दारी करूनही शिवसैनिक मात्र आजही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांशी बांधील आहे. आगामी काळात जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून पक्षाला उभारी देण्याचे काम प्रामाणिकपणे करणार आहे. शिवसेनेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार आहे असा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला.



उल्हास गिराम यांची शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी प्रभारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. उल्हास गिराम यांनी आतापर्यंत पक्षाचे काम एकनिष्ठतेने केले आहे. ठिकठिकाणी त्यांच्या सत्काराचे आयोजन केले जात आहे. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. उल्हास गिराम म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे तो विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी माझी आहे. आजही बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात आणि प्रत्येक घरात निष्ठावंत शिवसैनिक आहेत. गेल्यास वीस वर्षापासून शिवसेनेचा आमदार किंवा खासदार नसतानाही आणि अनेकांनी पदे मिळवून गद्दारी केलेली असतानाही बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्या ताकदीला एकत्र करण्याचे काम आमचे आहे. जुन्या आणि नव्या शिवसैनिकांची मोट बांधून नव्या उमेदीने कामाला लागायचे आहे. बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा शिवसेनेचा झंझावात निर्माण करायचा आहे असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## दिवंगत संतोष देशमुखांच्या पक्क्या घराची वीट रचली, महंतांकडून भूमिपूजन

केज : सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्र हादरला .खंडणी अपहरण ते निर्घृण हत्या प्रकरणात संतोष देशमुखांना संपवताना आरोपींनी आनंदोत्सव साजरा केलेल्या चित्रफिती समोर आल्या आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली . ९ डिसेंबरला आपल्या कुटुंबातील करत्या पुरुषाची हत्या झाल्याचे समजताच कुटुंबीयांच्या आक्रोशाने मस्साजोग हादरले .आपल्या गावातील ग्रामस्थांचे घर पक्के असेल तेव्हाच मी स्वतः घर बांधेन असा संकल्प सरपंच संतोष देशमुख यांचा होता .मात्र शेवटची इच्छा अपूर्णच राहिल्याचे कुटुंबाकडून कळतात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना दिलेला पक्क्या घराचा शब्द पाळला आहे .पुढील तीन ते चार महिन्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील देशमुख कुटुंबाचे घर तयार होणार असल्याची माहिती शिंदे गट जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी दिली .

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्यानंतर देशमुख कुटुंबातील सदस्यांना वास्तव्यासाठी पक्के घर देऊ असा शब्द शिवसेना शिंदे गटाने दिला होता .अखेर

### शिंदेंनी शब्द पाळला



उपमुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून देशमुख यांच्या घराचे भूमिपूजन पार पडले आहे . श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज ,भगवान महाराज यांच्यासह जिल्हाप्रमुख अनिल जगताप सचिन मुळूक यांच्या हस्ते संतोष देशमुख कुटुंबीयांच्या घराचे भूमिपूजन पार पडले .

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



## संपादकीय

# गुंतवणुकीचा पहाटवारा

कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये ८००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची घोषणा, ३३१ उद्योजकांचे करार आणि ७२ हजार रोजगार निर्मितीची आशा आहे. ऊर्जा, औषधनिर्माण, रसायने, अभियांत्रिकी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये गुंतवणूक प्रस्ताव आहेत. ठाण्यासह, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये नवीन उद्योगसंस्थांची उभारणी होईल. औद्योगिक विकासासाठी कोकणवासीयांना मोठे उपाययोजना गरजेच्या आहेत.

काही काळापूर्वी झालेल्या अतिविशाल प्रकल्पांच्या घोषणांपाठोपाठ कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार, ही होळीनिमित्त कोकणवासीयांना मिळालेली भेटच म्हणावी लागेल. ठाण्यात झालेल्या कोकण विभागीय गुंतवणूक परिषदेत वेगवेगळ्या क्षेत्रांमधील ३३१ उद्योजकांनी उद्योगांच्या स्थापनेबाबत सरकारशी करार केले असून, त्यातून सुमारे ७२ हजार नव्या रोजगारांची निर्मिती होण्याची आशा आहे. त्यामध्ये ऊर्जा, औषधनिर्माण, निर्यात, रसायने, अभियांत्रिकी, कपडे उत्पादनापासून माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्र असे वैविध्य आहे. काही काळापूर्वीच 'वेल्लोर इन्फोटेक' किंवा 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'ने उद्योग स्थापनेबाबत दाखविलेला रस, त्यातून येऊ घातलेला अतिविशाल दारूगोळा निर्मिती प्रकल्प यापाठोपाठ नव्याने झालेल्या या करारांमुळे कोकणात उद्योगसंस्कृती उभी राहण्याची आशा निर्माण झाली आहे. यामध्ये औद्योगिकदृष्ट्या आघाडी घेतलेल्या ठाण्यामध्ये सर्वाधिक म्हणजे पावणेपाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणे साहजिक आहे. त्यापाठोपाठ पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतही प्रकल्प सुरू करण्याबाबत उद्योजकांनी कमीअधिक प्रमाणात रस दाखविला आहे. उद्योगांबाबत कागदावर झालेला करार प्रत्यक्षात आणण्याचे आव्हान आता सरकारपुढे असेल.

उद्योगांच्या स्थापनेमध्ये महाराष्ट्राने स्थापनेपासूनच देशात आघाडी घेतली होती; पण आता उद्योग आणि आर्थिक प्रगतीचे सर्वच राज्यांना भान आले असून, त्यातून राज्यापुढे मोठी स्पर्धा उभी राहिली आहे. प्रामुख्याने मुंबई, पुणे व नाशिक या त्रिकोणात महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती वाढली आणि विकासाचे एक असंतुलन निर्माण झाले. त्यानंतर विदर्भ-मराठवाड्यातही उद्योग नेण्याचे प्रयत्न सुरू झाले. या स्पर्धेत कोकण मात्र मागे पडला. याला अनेक कारणे आहेत. माजी मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांनी पुढाकार घेऊन रायगड व परिसरात काही मोठे कारखाने आणले. नंतर मात्र कोकणच्या औद्योगिक विकासाच्या गाडीने अपेक्षित वेग घेतला नाही. वीज, पाणीपुरवठा, रस्ते आणि बँकिंगसारख्या सुविधा आदींचा अभाव हे त्यामागील प्रमुख कारण. देशातील महत्त्वाचा महामार्ग असलेल्या मुंबई-गोवा रस्त्याच्या दुरवस्थेचे दुष्टचक्र थांबलेले नाही. इतर रस्त्यांचा विकास आणि दळणवळणाची साधने यांबाबतही समाधानकारक स्थिती नाही. राजकीय उदासीनता आणि स्थानिकांचा विरोध ही अन्य काही कारणे आहेत. कोकणात येऊ घातलेल्या नव्या कारखान्यांचे स्वागतच विरोधाने होते, असा समज निर्माण झाला आहे. पाच दशकांपूर्वीच्या 'स्टरलाइट' प्रकल्पापासून 'एन्रॉन', 'जैतापूर', 'बारसू' अशा प्रकल्पांची यादी मोठी आहे. प्रदूषणकारी प्रकल्पांना विरोध करण्यामागे स्थानिकांच्या मनात अनेक चिंता आहेत आणि त्या रास्तही आहेत. मात्र, त्यावर मार्ग काढता येऊ शकतो. काही उद्योगांमुळे नद्या-समुद्रकिनाऱ्यांचे होणारे प्रदूषण, आंब्यासारख्या पिकांना धोका होण्याची शक्यता, त्यातून आजवर कोकणच्या अर्थव्यवस्थेचा आधार असलेले पर्यटन, फलोत्पादन आणि मासेमारीला बसणारा फटका याबाबत सुवर्णमध्य काढणे आणि उपाययोजना करून स्थानिकांच्या मनांत विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.

कोणत्याही नव्या प्रकल्पाची चर्चा सुरू झाली, की एकीकडे सर्वसामान्य प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जातात, तर दलाल आणि बड्या धेंडांकडून मोठ्या प्रमाणात जमीनखरेदी होते. त्यामुळे पारदर्शक भूसंपादन करून या विकासाची फळे स्थानिकांपर्यंत पोहोचविणे, हे सरकारपुढील आव्हान आहे.

काही काळापूर्वी कोकण रेल्वेचे स्वप्न साकार झाल्याने कोकणवासीयांच्या मनात विकासाची नवी स्वप्ने निर्माण झाली; पण त्यानंतरही कोकणात औद्योगिक-आर्थिक विकासाने मोठी गती घेतलेली नाही. आता आसपासच्या परिसरातून या विकासाला पूरक पायाभूत सुविधा उभ्या राहत आहेत. विशेषत: जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टनंतर वाढवणच्या रूपाने निर्यातीचे महाद्वार लवकरच खुले होत आहे. सोबतच कोकण परिसरात लहानमोठ्या जेट्टीही उभ्या राहत आहेत. नवी मुंबईतील विमानतळाने शेतीमाल व औद्योगिक उत्पादनांसाठी जगाची बाजारपेठ जवळ येत आहे.

# निजामकालीन रणखांब शिलालेखाचे यशस्वी संवर्धन

## बीड महावारसा समिती आणि पुरातत्व विभागाचा महत्त्वपूर्ण उपक्रम

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी बीड जिल्हा महावारसा समिती आणि पुरातत्व विभागाच्या संयुक्त प्रयत्नांतून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शहरातील ऐतिहासिक रणखांब शिलालेखाच्या संवर्धनासाठी, तसेच रहदारी आणि अपघात टाळण्यासाठी त्याचे संरक्षित स्थळी विस्थापन करण्यात आले आहे.

इतिहासाचा साक्षीदार 'रणखांब' शिलालेख

बीड शहरातील चंपावती शाळेसमोर रस्त्याच्या मधोमध उभा असलेला निजामकालीन रणखांब शिलालेख हा स्थानिक इतिहासाचा एक मौल्यवान वारसा आहे. मात्र, रहदारीच्या वाढत्या दडपणामुळे आणि संभाव्य अपघातांमुळे या ऐतिहासिक शिलालेखाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा महावारसा समितीच्या २७ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत याच्या संवर्धनासाठी ठोस निर्णय घेण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महावारसा समितीतील तज्ज्ञ, पुरातत्व विभाग, पोलिस प्रशासन, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विविध तज्ज्ञ व्यक्तींनी पुढाकार घेतला. त्यांच्या सहकार्याने दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी रणखांब शिलालेखाचे सुरक्षित विस्थापन करून त्याला चंपावती शाळेच्या जागेत नव्याने स्थिर करण्यात आले.

महत्वाच्या व्यक्तींचा मोलाचा सहभाग

या महत्त्वपूर्ण कार्यात मा. जिल्हाधिकारी, मा. पोलिस आयुक्त, मा. आयुक्त महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रादेशिक पर्यटन विभाग आणि इतर शासकीय यंत्रणांचा मोलाचा वाटा राहिला.



तसेच इतिहास आणि स्थापत्यशास्त्राच्या तज्ज्ञांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रा. डॉ. अनिता शिंदे (इतिहास विभाग प्रमुख), डॉ. शांता जाधवर (भारतीय मूर्ती व स्थापत्य संशोधन परिषद), डॉ. सतीश साळुंखे (बीड जिल्हा इतिहास परिषद) आणि स्थापत्य विशारद श्री. आकाश कराड यांनी यासाठी विशेष योगदान दिले.

### इतिहासाचे जतन आणि भविष्याचा वारसा

या यशस्वी संवर्धनामुळे केवळ ऐतिहासिक ठेवा संरक्षित झालेला नाही, तर बीड जिल्ह्यातील इतर वारसास्थळांच्या जतनासाठीही एक आदर्श प्रस्थापित झाला आहे. रणखांब शिलालेख आज सुरक्षित स्थळी उभा राहून आपल्या ऐतिहासिक अस्तित्वाची साक्ष देत आहे.

डॉ. शांता जाधवर- सचिव, भारतीय मूर्ती आणि स्थापत्य संशोधन परिषद

बीड जिल्हा महावारसा समिती आणि पुरातत्व विभागाच्या अथक प्रयत्नांमुळे ही ऐतिहासिक वास्तू भविष्यातील पिढ्यांसाठी जतन केली गेली आहे. अशा उपक्रमांमधून ऐतिहासिक वारशाचे जतन होण्यास मदत होईल, याकडे प्रस्तुत प्रकल्पाचे मोठे यश म्हणून पाहिले जात आहे.

भविष्यातील अभ्यासक, संशोधक आणि इतिहासप्रेमींसाठी ही मोलाचे ठरेल. पुरातत्व विभाग अशा ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध आहे. या शिलालेख संवर्धनामुळे बीड जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशास एक नवे आयाम मिळाले असून, भविष्यातही अशा महत्त्वपूर्ण ठेव्यांचे जतन करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

सौ. जया वाहने (सहायक संचालक, पुरातत्व विभाग, छ. संभाजीनगर)

# चाळण झालेल्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम

## नगरपालिकेचा मनमानी कारभारा विरुद्ध सोमवारी आंदोलन - डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे.त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे.या रस्त्यावर खड्डे,वाळु,वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे.



या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे.मात्र याचवेळी प्रमुख रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणा-या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली ? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोमवारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



# ज्येष्ठ समाजसेवक डॉ संजय तांदळे यांचा पोलीस प्रशासनाच्या वतीने सत्कार

प्रतिनिधी । बीड

बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत पोलीस प्रशासनाच्या वतीने मंगळवार दिनांक १८ रोजी वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये यथोचित सत्कार करण्यात आला.सामाजिक कार्याबरोबरच ते निरोगी व निरामय जीवन कसे राहावे यासाठी जनतेला तसेच पोलिसांना योगाचे प्रशिक्षण देण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाची दखल घेऊन पोलीस प्रशासनातील जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख उस्मान यांनी दखल घेऊन मंगळवार दिनांक १८ रोजी सुभाष रोड येथील वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पोलीस हवालदार श्रीकांत पाखरे, शिवदास घोलप, चालक संतोष हारके



# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । केज

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान संचलीत राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळेचे पूर्णवेळ कामकाज शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थी -विद्यार्थिनींनी पार पाडले.शालेय प्रशासनाचा अनुभव येण्यासाठी तसेच नेतृत्वगुण विकसित होऊन नियोजनाचे धडे मिळावेत यासाठी दरवर्षी स्वयंशासन दिनाचे आयोजन शाळेत करण्यात येते.

सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.व विद्यार्थिनी मुख्याध्यापिका यांनी पुष्पहार घालूनअभिवादन केले व शालेय कामकाज सुरु केले.शाळेतील पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापन करण्यात आले व शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

पान १ वरून...

**विधान परिषद पोटनिवडणूक....**

विधानसभेत महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या आमदारांची संख्या कमी आहे. त्यामुळे उमेदवार दिला तरी यश मिळणार नसल्याची खात्री असल्याने महाविकास आघाडीने या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही.

विधान परिषदेची निवडणूक कशी होते?

विधानसभा निवडणुकीप्रमाणे विधान परिषदेत थेट निवडणूक प्रकिया नाही. राष्ट्रपती निवडणूक, सिनेट यासारख्या निवडणुकीसाठी पसंतीक्रमाची पद्धत इथे वापरली जाते. निवडणुकीसाठी जितके मतदार उभे असतील तेवढ्या उमेदवारांना पसंती क्रम देता येतो.

संबंधित मतदारसंघाची मतदार संख्या आणि उमेदवार यांच्यानुसार निवडणूक आयोग एक कोटा निश्चित करते. निर्धारित कोट्याएवढी प्रथम क्रमांकांची मते मिळवणारा उमेदवार विजयी होतो. पहिल्या पसंतीची मते कोट्याएवढी नसल्यास दुसऱ्या पसंतीची मते जो पूर्ण करील तो उमेदवार विजयी होईल. निर्धारित कोटा पूर्ण करणारा कोणत्याही पसंतीचा उमेदवार विजयी होऊ शकतो. यात कोणाचेही मतदान वाया जात नाही.

विधान परिषद निवडणुकीत सर्वांत मोठा मुद्दा गुप्त मतदानाचा आहे. राज्यसभेत खुले मतदान असल्याने पक्षाच्या आमदारांना मत दाखवून टाकावे लागते. पण विधान परिषदेत आमदार गुप्त मतदान करतात. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर क्रॉस वोटिंग होण्याची शक्यता नेहमी व्यक्त केली जाते.

**बीडच्या धनंजय नागरगोजे...**

बीड जिल्ह्यातील एका आश्रम शाळेतील शिक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणात अद्याप कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. मात्र तक्रार दाखल न करून घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी अविनाश पाठक समाज कल्याण अधिकाऱ्यांमार्फत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

बीड शहरातील कृष्ण अर्बन बँकेच्या आवारात धनंजय नागरगोजे या शिक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. आत्महत्या करण्यापूर्वी नागरगोजे यांनी एक सुसाईड नोट सोशल माध्यमावर पोस्ट केली होती. अठरा वर्षांपासून पगार न मिळाल्याने आत्महत्या करत असल्याचा उल्लेख या सुसाईड नोटमध्ये करण्यात आला होता. घटना घडल्यानंतर कोणीही या प्रकरणात तक्रार न देण्यासाठी पुढे न आल्याने गुन्हा दाखल झाला नाही. मात्र किमान वेतन कायदा डावलल्या प्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करा. तसेच संबंधित संस्थाचालक यांच्या विरुद्ध देखील आत्महत्येस

पान १ वरून...

जबाबदार असल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असता या प्रकरणी आता हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**नागपूर दंगलीवर....**

गणेशपेठ पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हा दाखल केला. दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी हा गुन्हा दाखल झाला.

त्यानंतर सायंकाळी एक अफवा अशी पसरवली गेली की, सकाळच्या आंदोलनात जी प्रतिकात्मक कबर जाळली त्याच्या कापडावर धार्मिक मजकूर होता. यामुळे अत्तररोडमधील नमाज आटोपून २०० ते २५० चा जमाव त्या ठिकाणी जमला. हा जमाव नारेबाजी करू लागला. याच लोकांनी आग लावून टाकू, असे हिंसक बोलण्यास सुरूवात केल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी बळाचा वापर केला. यावेळी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांविरोधात तक्रार द्यायची आहे, अशी मागणी केल्याने त्यांना गणेशपेठ पोलिस ठाण्यात निमंत्रित करण्यात आले.

एकीकडे पोलिसांची कारवाई सुरू असताना दुसरीकडे हंसापुरी भागात २००-३०० लोक हातात काठ्या घेऊन दगडफेक करू लागले. त्यांच्या तोंडावर फडके बांधले होते. या घटनेत १२ दुचाकींचे नुकसान झाले. या घटनेत काही लोकांवर घातक शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. तिसरी घटना भालदारपुरा सायंकाळी ७.३० वा. झाली. तिथे ८० ते १०० लोकांचा जमाव होता. त्यांनी पोलिसांवर हल्ला केला. त्यामुळे अश्रुधूर व सौम्य बळाचा वापर करावा लागला. या घटनेत १ क्रेन, २ जेसीबी व काही चारचाकी वाहने जाळण्यात आली.

**दिवंगत संतोष देशमुखांच्या...**

संतोष देशमुख यांच्या हस्तेनंतर कुटुंबावर मात्र दुःखाचा डोंगर कोसळला .भावाच्या हत्येचा न्याय मागण्यासाठी धनंजय देशमुख यांनी पोलीस ठाणे,प्रशासन यांच्याकडून वारंवार पाठपुरावा करत न्यायाची मागणी लावून धरली .संतोष देशमुख यांच्या हत्येने सारा गाव हळहळला .दरम्यान,देशमुख कुटुंबीयांना वास्तव्यासाठी पक्के घर देण्याचं वचन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं . या कुटुंबाला धीर देण्यासाठी , आणि शासनाचं कर्तव्य म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देशमुख कुटुंबीयांशी चर्चा केल्यानंतर त्यांना घर बांधून देणार असल्याचं जाहीर केलं होतं .आता या घराच्या जागेचं भूमिपूजन करण्यात आल्याची माहिती शिवसेना जिल्हा प्रमुखांनी माध्यमांना दिली . देशमुख यांच्या निधनानंतर शिवसेना शिंदे गटाने देशमुख कुटुंबाला शब्द दिला होता. आणि तो शब्द आता पूर्ण करण्यात आला आहे. पुढील तीन ते चार महिन्यात देशमुख कुटुंबाचे मसाजोग गावात पक्के घर असणार आहे. असेही शिंदेगटाकडून सांगण्यात आले आहे.

# वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्या जमातीच्या लोकांचा गावात धुमाकूळ तर शेतात धुडगूस

बीड /प्रतिनिधी

विविध राजकीय पक्षाच्या तथाकथित स्थानिक नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या आणि गावगुंडांच्या आश्रयाने दिवसा डोंगर पट्ट्यात वन्य प्राण्यांची शिकार आणि रात्री शेतीमालाच्या चोऱ्या करून गावात मध्य प्राशन करून धुमाकूळ घालणाऱ्या आणि रात्री शेतकऱ्यांच्या शेत मालाची चोरी करून मौजमजा करणाऱ्या शिकारी पारधी समाजाच्या लोकांच्या उपद्रवामुळे या तालुक्यातील ग्रामीण नागरिक, शेतकरी त्रस्त झाले आहेत, या जमातीच्या लोकांना साधे हटकले तरी गावगुंडांच्या व स्थानिक पोलिसांच्या मदतीने महिलांना पुढे करून गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याने या जमातीच्या लोकांच्या विरोधात तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नसल्याने दिवसेंदिवस या लोकांचा उपद्रव या तालुक्यात वाढू लागला आहे.

आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील अनेक गावच्या शिवारातील वनविभागाच्या आणि गायरान जमिनीवर पारधी समाजाच्या लोकांनी गावोगावच्या तथाकथित टपोरीछाप युवा नेते आणि गावगुंडांच्या आश्रयाने अतिक्रमण करून आपल्या वस्त्या निर्माण केल्या आहेत. दिवसभर माळरानावर डोंगरपट्ट्यात हरिण , काळवीट ,मोर ,ससे या वन्य प्राण्यांच्या शिकारी करायच्या दुपारनंतर शिकार केलेल्या वन्य प्राण्यांचे मांस विक्री करायचे आणि सायंकाळी मध्य प्राशन करून गावातील प्रमुख चौकात रस्त्यावर धुडगूस घालायचा व रात्री शेतकऱ्यांच्या शेतमालाची चोरी करायची आणि मौजमजा करायची हा एकमेव धंदा या समाजाच्या लोकांनी सुरू केल्याने गावात नागरिक व शेतात शेतकरी या लोकांच्या उपद्रवामुळे त्रस्त झाले आहेत .या समाजाच्या एखाद्या व्यक्तीला साधे हटकले किंवा विरोध केला तर त्या नागरिका विरुद्ध किंवा शेतकऱ्या विरुद्ध राजश्रय प्राप्त गावगुंडांच्या मदतीने व पोलीस प्रशासनाच्या मदतीने महिलांना पुढे करून गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याच्या

धमक्या दिल्या जातात. यामुळे या लोकांच्या उपद्रवाविरुध्द कोणीही तक्रार द्यावयास धजत नाही. शेतकऱ्याने व गावकऱ्यांनी तक्रार केली असता संबंधित स्थानिक पोलीस प्रशासनाकडून आरोपी बरोबर संगणमतकरुन फिर्यादी विरुद्धच पारधी समाजाच्या महिलांची तक्रार घेऊन नागरिक व शेतकऱ्यांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल केला जातो .त्यामुळे या समाजाचे मनोबल दिवसेंदिवस उंचावत चालले असल्याचे राजरोसपणे या तालुक्यात बोलले जाऊ लागले आहे. या संदर्भामध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी व या समाजाच्या उपद्रवास पायबंद घालावा. नागरिक व शेतकऱ्यांच्या विरुद्ध येणाऱ्या या समाजाच्या तक्रारींची गुन्हा नोंद करण्यापूर्वी चौकशी करावी, अशी रास्त मागणी जनतेतून होत आहे.

## राष्ट्रीय किशोरवयीन स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र डोनगांव येथे

# किशोरवयीन मुलांना बॅग वाटप व आरोग्य विषयी जनजागृती कार्यक्रम करण्यात आले



**प्रतिनिधी** । जाफ्राबाद

दि.१८ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र डोणगांव येथे राष्ट्रीय किशोरवयीन स्वाथ्य कार्यक्रमा अंतर्गत पिअर एज्युकेटर यांना बॅग वाटप करण्यात आल्या.हा कार्यक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारी मॅडम व जिल्हा सामान्य रुग्णालय जालनाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजेंद्र पाटिल सर ,जिल्हा किशोरी समन्वयक पांडुरंग अवचार, ग्रामीण रुग्णालय टेंभुर्णी वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुभाष शिंगने सर, वैद्यकीय अधीक्षक डॉ डी.एम.पाटील सर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रतिभा मुळीक मॅडम, श्री.कऊटकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. किशोरवयीन मुलांना व मुलींना किशोरवयीन वयात होणारे बदल, पोषक आहार,वाढ व विकास,स्किनला होणारे आजार,ताण तणाव,मानसिक आरोग्य,व्यसनाधीनता,लैंगिक शिक्षण, असंसर्गजण्य आजार, लोहयुक्त गोळ्या , कुपोषण, ऍनिमिया,वैयक्तिक स्वच्छता,लैंगिक शिक्षण, किशोरवयीन वयात होणारे शारीरिक मानसिक बदल, मासिक पाळी स्वछता व , सॅनिटरी पॅड , गरोदरपणात घ्यावयाची काळजी, कौटुंबिक हिंसाचार,लग्नपूर्व समुपदेशन इत्यादी बद्दल समुपदेशक श्री.मल्हारी भगवान उमाप व श्री.सागर दांडगे यांनी मार्गदर्शन केले.तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य आजाराबद्दल श्री.शरद सुर्वे यांनी माहिती दिली.यावेळी डॉ.मुळीक मॅडम यांनी नियमित हात स्वच्छ धुणे,नियमित पोषक आहार घेणे, असंसर्गजन्य आजार ,लैंगिक शिक्षण,मुलींना मासिक पाळीत घ्यावयाची काळजी,मासिक पाळीचे चक्र व मैत्री क्लीनिक चा लाभ घेण्याचे आव्हान केले.यावेळी डॉ.अर्चना अघाव मॅडम,श्री.गणेश डोईफोडे,श्री.घायाळ सर,गाडेकर मॅडम, गट प्रवर्तक श्रीमती गायकवाड मॅडम,आरोग्य सहाय्यिका,आरोग्य सेवक,आशा उपस्थित होते.डोईफोडे सरांनी सर्वांचे आभार मानले.

# समग्र शिक्षा अभियान राष्ट्रीय आविष्कार उपक्रमातंर्गत अभ्यास दौरा संपन्न

**प्रतिनिधी** । अंबड

समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद जालना अंतर्गत राष्ट्रीय आविष्कार उपक्रमातंर्गत राज्याबाहेर अभ्यास दौरा नुकताच (दि.७ ते १२) दरम्यान संपन्न झाला.या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी कर्नाटक राज्यातील म्हैसूर,बंगळूरू येथील विविध ठिकाणांना भेटी देऊन माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांचे अनुभव विश्व संपन्न व्हावे,त्यांना परराज्याची माहिती मिळावी,निरीक्षण क्षमता विकसित व्हावी,सांस्कृतिक ओळख व्हावी यासाठी जालना जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री कैलास दातखीळ, उपशिक्षणाधिकारी श्री सुभाष भालेराव,श्री शाम देशमुख, लेखाधिकारी श्री संजय गादीवर,सहाय्यक लेखाधिकारी बबनराव मिसाळ,समग्र शिक्षा अभियान सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुनील मावकर यांच्या मार्गदर्शनानुसार जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग नोंदविला.यावेळी विद्यार्थ्यांनी रेल्वेच्या प्रवासाचा आनंददायी अनुभव घेतला.या अभ्यासदौऱ्यात कर्नाटक



राज्यातील म्हैसूर येथील प्रसिद्ध ऐतिहासिक पॅलेस,वृंदावन गार्डन,प्रसिद्ध चर्च,चांमुडा हिल्स,प्राणीसंग्रहालय येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली.त्याचबरोबर कर्नाटक राज्याची राजधानी बंगळूरु येथील लालबाग,विश्वेश्वरय्या औद्योगिक व प्रौद्योगिक संग्रहालय,हिंदुस्थान एरोबिक्स लिमीटेड हेरीटेज सेंटर व एरोस्पेस म्युझियम,इस्कॉन टेम्पल अशा विविध वैज्ञानिक,भौगोलिक,ऐतिहासिक, स्थळांना भेट देऊन संकल्पना समजावून घेतल्या.

या अभ्यासदौऱ्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा केंद्र डोणगाव तालुका अंबड येथील इयत्ता आठवीचे वेदिका विलास वाकडे व संस्कार भगवान मिठे हे विद्यार्थी आणि उपक्रमशील शिक्षक श्रीधर यशवंतराव कुलकर्णी सहभागी झाले होते.सर्वांचे अंबडचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण,शिक्षणविस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,गट समन्वयक अशोक ढेरे, केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर, मुख्याध्यापक कैलास जाधव,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत यांनी अभिनंदन केले आहे.

हा अभ्यासदौरा यशस्वी करण्यासाठी समग्र शिक्षा जिल्हा परिषद जालनाचे सहाय्यक लेखाधिकारी बी.ए.मिसाळ,प्रशांत सोरटी,राजेश ठाकुर,शिक्षिका नंदा वलकुट्टी,अर्चना गुंगे,अर्चना कंदारे शिक्षक श्रीधर कुलकर्णी,जगदिश डोंबे,अनंता जाधव यांनी परीश्रम घेतले.



बीड - पाली महसूल विभागाच्या मंडळ अधिकारी श्रीमती शीतल चाटे यांना राज्यस्तरीय रयत सामाजिक प्रतिष्ठानचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना पत्रकार रविंद्र राऊत व सौ.शारदा रविंद्र राउत.


# जिल्हा परिषद हायस्कूल करखेलीच्या मार्च २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांना ५० हजाराची बक्षिसे – मोईजसेठ करखेलीकर

## ३ विद्यार्थ्यांचे ११ वी व १२ वी साठी शैक्षणिक पालकत्व स्विकारून संपूर्ण खर्च करणार

**अशोक पडोळे** । धर्माबाद

जिल्हा परिषद हायस्कूल, करखेली ता. धर्माबाद च्या शैक्षणिक वर्ष: मार्च -२०२५ मधील १० वी उत्तीर्ण मराठी व उर्दू माध्यमाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना व नुसरत कंट्रक्शनचे संचालक मोईज सेठ बिडीवाले करखेलीकर यांनी ५००००/- रुपयाची रोख (पन्नास हजार रुपये)पारितोषिके घोषित केली आहेत.

मराठी व उर्दू माध्यमांसाठी प्रथम विद्यार्थ्यास ५००० रु., द्वितीय विद्यार्थ्यास ३००० रु तृतीय विद्यार्थ्यास २००० रु प्रत्येकी. असे एकूण २००००/- -रुपये व मराठी व उर्दू माध्यमातल्या प्रत्येक विषयासाठी प्रथम विद्यार्थ्यास २५०० रुपये असे एकूण ३००००/- रुपये तसेच शैक्षणिक वर्ष मार्च:२०२५ मधील १० वी उत्तीर्ण मराठी माध्यमाच्याप्रथम व द्वितीय गुणवंत २ विद्यार्थी व उर्दू माध्यमाच्या प्रथम गुणवंत ०१ विद्यार्थी असे एकूण ३ विद्यार्थ्यांचे ११ वी व १२ वी साठी शैक्षणिक पालकत्व स्वीकारून संपूर्ण खर्च करणार आहेत.अशा प्रकारे येणाऱ्या ३ वर्षासाठी ही दोन्हीपारीतोषिकाची त्यांनी जाहीर केली आहे. याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.या पारितोषिक योजनाचे संयोजक तथा प्र. शिक्षण विस्तार अधिकारी बीटकरखेलीचेशिवकुमार पाटील यांनी अशी माहिती दैनिक समर्थ राजयोगचे प्रतिनिधी अशोक पडोळे यांना दिली.



जिल्हा परिषद शाळा टिकल्या पाहिजेत, त्यात मुले शिकली पाहिजेत...

या पारितोषिक योजनांमुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन त्यांना प्रेरणा मिळते व आर्थिक लाभ ही होतो.ग्रामीण भागातीलविद्यार्थीरुपी हिऱ्याला पैलू पडण्याचे काम जिल्हा परिषद शाळांमध्ये केले जाते. अनेक वरिष्ठ अधिकारी, समाजसेवक, नेते मंडळी यांचे शिक्षण जिल्हा परिषद शाळांमध्ये झाले आहे. ग्रामीण भागातील समाजातल्या तळागाळातील विद्यार्थी आजही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. अलीकडे पटसंख्या रोडाऊ लागल्याने या शाळांच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.तेव्हा ग्रामीण भागातल्या जिल्हा परिषद शाळा टिकल्या पाहिजेत, त्यात मुले शिकली पाहिजेत हा उदात्त दृष्टिकोन घेऊन करखेलीचे भूमिपुत्र असलेले प्रसिद्ध नुसरत कन्स्ट्रक्शनचे संचालक श्रीमोईज सेठ बिडीवाले करखेलीकर यांनी या बक्षीस योजनांची आखणी केली.अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढीस मदत होते.या अगोदर श्री मोईज सेठ बिडीवालेवाले यांनी फुलेनगर धर्माबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व परिसराचे भव्य सुशोभीकरण केले आहे.

# खापरवाडी (रत्नापूर )या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

## क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ,आयोजक दत्ता पटाईत यांचे आव्हान

**प्रतिनिधी** । वडवणी

वडवणी तालुक्यातील खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा चषक खापरवाडी रत्नापूर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, दिनांक २० ,३.२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी नऊ वाजता रत्नापूर या ठिकाणी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे ,तरी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक जयसिंग भैय्या सोळंके माजी सभापती जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते होणार आहे, या कार्यक्रमाला पंचक्रोशातील क्रिकेट प्रेमी उपस्थित राहावे, व या क्रिकेट संघातर्फे प्रथम बक्षीस खापरवाडी चे विद्यमान सरपंच सचिन लंगडे व उपसरपंच ऋषिकेश पटाईत यांच्यावतीने ३१ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, दुसरे बक्षीस औदुंबर सावंत माजी जिल्हा परिषद सदस्य व आनंद काळे यांच्यावतीने १५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, व तिसरे बक्षीस डॉ,गणेश सुरवसे, यांच्यावतीने ७५०० च बक्षीस देण्यात येणार आहे, यामध्ये विशेष सहकार्य बजरंग बप्पा साबळे




तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी, संभाजी तात्या शिंदे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी, विश्वास आगे माजी सरपंच देवडी, ज्ञानेश्वर सुरवसे माजी सरपंच देवगाव, गोविंद बादाडे उपसरपंच काडीवडगाव, ईश्वर पटाईत माजी ग्रामपंचायत सदस्य खापरवाडी, नितीन लंगडे, बब्रुवान इतापे सचिव सेवा सहकारी सोसायटी, नितीन गोजे इंडियन आर्मी, रामहरी पटाईत गणेश पॅथॉलॉजी हे पाणी सेवा देणार आहेत, मॅन ऑफ द मॅच, साई राम बॅटरी वडवणी, बेस्ट बॅट्समन मुकुंद लंगडे हर्षद टायर्स माजलगाव, बेस्ट कीपर संग्राम चोरगे संग्राम मल्टी सर्विसेस खापरवाडी, मॅन ऑफ द सिरीज तानाजी आजबे इंजिनियर पंचायत समिती वडवणी, आयुष ट्रेडर्स चे मालक वैभव लंगडे ,बेस्ट बॉलर दादासाहेब गव्हाणे इंडियन आर्मी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने व आयोजक क्रिकेट प्रेमी कमिटी यांच्यावतीने खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी भव्य क्रिकेट स्पर्धा मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडणार आहे या कार्यक्रमाला या क्रिकेट प्रेमींच्या खेळाला वाव देण्यासाठी परिसरातील क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने युवक बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्यात यावे असे आव्हान आयोजक दत्ता पटाईत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अकोली गावातील भ्रष्टाचाराची चौकशी करा

**प्रतिनिधी** । जालना

परतूर तालुक्यातील अकोली येथील - ग्रामपंचायतच्या सरपंच, ग्रामसेवकांसह संबंधित अधिकाऱ्यांनी विविध विकास कामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी आज १७ मार्चपासून जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. या घोटाळ्याची तात्काळ चौकशी होईपर्यंत बेमुदत उपोषण मागे घेणार नसल्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

परतूर तालुक्यातील अकोली ग्रामपंचायत येथे मातोश्री पाणंद रस्ते, नाला पुनरुज्जीवन, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक, भूमिगत गटार, वैयक्तिक




लाभ शेततळे, सिंचन विहिरी वैयक्तिक लाभ, १५ वा वित्त आयोग, जनसुविधा अंतर्गत सिमेंट रस्ते आदी विविध विकासकामे व योजनांमधून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची विनंती करूनही चौकशी न करण्यात आल्याने ३ मार्च रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे आज १७ मार्च रोजीपासून उपोषण सुरू करीत आहोत. अकोली येथे २०१७ ते आजपर्यंत विविध विकासकामांच्या व योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु, आपल्या कार्यालयाकडून कुठलीही दखल न घेतल्यामुळे आज १७ मार्च रोजीपासून आम्ही उपोषण सुरू करत असल्याचे उपोषणकर्ते सिद्धेश्वर सोळंके, पंजाब देशमुख, रवि भानुसे, ओमकार देशमुख, विकास खुळे, सुधाकर सोळंके यांनी म्हटले आहे

# प्रत्येक गावातील तलावांचे होणार आता पुनरुज्जीवन

**प्रतिनिधी** । छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने या वर्षी जोरदार तयारी केली आहे. राज्यातील प्रत्येक गावांच्या तलावातील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणे, नाला खोलीकरण-रुंदीकरण करणे यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना ताकदीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. कोणतीहीस्वयंसेवी संस्था अथवा ग्रामपंचायतीला या कामांसाठी अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार काम करता येईल. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे. शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोहोत्सान देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. अशा प्रकारची कामे आणि हजारो गावात पाण्याची कामे करण्याचा बारा वर्षांचा अनुभव बीजेएसच्या पाठीशी आहे.

### तलावातला गाळ काढण्यासाठी शासनाची खास योजना

या योजनेत सहभागी होण्यासाठी सरपंचांनी आपल्या गावांचा मागणी अर्ज ु.ीहळुररी.ले वर ऑनलाइन भरावा. बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकऱ्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करण्यासाठी सज्ज आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे. योजनेची सर्व माहिती 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या शासनाच्या पोर्टलवर दिली असून त्यासाठी 'ु.ीहळुररी.ले' ही वेबसाइट पाहावी. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी तलावातील गाळ काढण्यासाठी, नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीजेएसचे राज्य महासचिव प्रविण पारख, जिल्हा जल क्रांति प्रमुख किशोर ललवानी व जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पगारिया,व महेन्दकुमार सकलेचा यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा- अशोक पटवर्धन

## बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी** । बीड

महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.

काल दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- जगताप, मुळूक गलधर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे

म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# अवघे वातावरण झाले शिवमय

## शिरापूरमध्ये शिवमहोत्सव भव्य पोवाड्यांचा कार्यक्रम शिवमय वातावरणात शिवछत्रपतींना मानवंदना देण्यात आली

प्रतिनिधी । आष्टी

तालुक्यातील शिरापूर येथे शिवमहोत्सव निमित्त भव्य पोवाड्याचा कार्यक्रमासह सह पारंपरिक वेशभूषेत नटलेले आबालवृद्ध... 'जय भवानी, जय शिवाजी' असा जयघोष... करत जि. प. शाळेतील विद्यार्थीनींनी आम्ही शिवकन्या यासह छत्रपती शिवाजी महाराज यांची गिते सादर केली अशा स्फूर्तिदायी अन् 'शिवमय' वातावरणात शिवछत्रपतींना मानवंदना देण्यात आली. पोवाडा, नृत्य, पाळणागीत, नाट्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणाव्दारे केलेले शिवरायांचे स्मरण भव्य असा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवकार्यावर आधारीत पोवाड्याचा कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवज्योत प्रज्वलित करून करण्यात



आली. यावेळी व्यासपीठावर सरपंच सोमीनाथ गायकवाड, मा. सरपंच बिभिषण कवडे, ग्रामसेवक नवनाथ लोंढे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार अक्षय विधाते आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध युवा शिवशाहीर सुनिल वाघचौरे आणि सहकारी यांचा भव्य पोवाडा कार्यक्रम शिरापूर सार्वजनिक शिवजयंती उत्सव व राजे ग्रुप, शिरापूर यांच्या वतीने सोमवारी दि. १७ मार्च रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये शिवशाहीर सुनिल वाघचौरे यांनी शिवजन्माचा आणि या देशाला जिजाऊचा शिवबा पाहिजे यासह अनेक पोवाडे रायगडावरील कथा आणि शिरापूर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीनींनी पाळणा गिते, आम्ही शिवकन्या गीते सादर केली. त्यानंतर पोवाडा, नृत्य, पाळणागीत, नाट्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणाव्दारे केलेले शिवरायांचे स्मरण यामुळे शिरापूर येथील शिवजयंती यावेळी अनोखी ठरली पोवाडा कार्यक्रम आणि वादनाला वेळोवेळी टाळ्यांच्या उत्स्फूर्त गजरात दाद मिळत होती. 'जय भवानी, जय शिवाजी', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन सावनकुमार तागड यांनी केले.

# अंबाजोगाई येथे लिंगायत कोष्टी समाज महिला संघटनेची स्थापना

प्रतिनिधी । अंबाजोगाई

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आणि महाराष्ट्र राज्य लिंगायत कोष्टी समाज संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त अंबाजोगाई येथे भव्य महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरवात श्रृती बिरंगे यांनी स्वागत गीत गाईले व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते चौंडेश्वरीदेवीच्या प्रतिमेची पुजा व दिप प्रज्वलन करून झाली,लिंगायत कोष्टी समाजाच्या महिला संघटनेची स्थापना करण्यात आली असून, नवनिर्वाचित कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.संघटनेच्या महिला अध्यक्षा सौ. सुनंदाताई आष्टगी यांच्या हस्ते कार्यकारिणी सदस्यांना नियुक्ती पत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. नव्याने स्थापन झालेल्या कार्यकारिणीमध्ये पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली:अध्यक्ष: सौ. सीमा वरवटकर उपाध्यक्ष: सौ. वर्षा चिमणगुंडे सचिव: सौ. अश्विनी नंदिकोले सहसचिव: सौ. किशोरी शेंगुळे कोषाध्यक्ष: सौ. सीमा




## उमराणे, रांजणकर व होळगे या रणरागिनींचाही सन्मान

शेंगुळे संघटक: सौ. श्रद्धा मसनाळे आदींची निवड करण्यात आली.महिला दिनानिमित्त समाजातील कष्टमय जीवन जगत संघर्षातून आपले स्वतंत्र विश्व निर्माण करणाऱ्या रणरागिणींचा विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी श्रीमती सुमनकाकू उमराणे श्रीमती लताताई रांजणकर श्रीमती शांताताई होळगे यांचा शाल, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला:

कार्यक्रमाला सौ. शितल वांडरे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था), सौ. सविताताई द्रुकर (अध्यक्ष, कोष्टी समाज अंबाजोगाई) आणि सौ. ज्योती सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. बालसंगोपन या विषयावर सौ. ज्योती सुरवसे यांनी मार्गदर्शन केले. तसेच, सासूची जावाई असाच असावा असा अट्टाहास का? या महत्त्वपूर्ण विषयावर सौ. सुरेखा बालाजी सवने शिरूर अनंतपाळ यांनी चर्चा करण्यात आली.यावेळी समाजातील जेष्ठ महिलांचाही सत्कार करण्यात आला.







# राजर्षी शाहू असोसिएशन व ढगेज् क्लासेसचे आदर्श पुरस्कार जाहीर

## प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाने यांच्या हस्ते होणार वितरण

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

मातीतल्या माणसा कडून मातीतल्या माणसासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी प्रति वर्षाप्रमाणे राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या वतीने दिले जाणारे 'आदर्श पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत त्याचे वितरण दिनांक २३ मार्च २०२५ रविवार रोजी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व सुप्रसिद्ध अभिनेते सुनिल गोडबोले यांच्या हस्ते होणार आहे.

राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तींना प्रतिवर्षी आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तसेच ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संकुलात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण कार्यक्रम मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात येणार आहे

आदर्श पुरस्कार वितरण सोहळयात आदर्श शिक्षक, समाजरक्षक, उद्योजक, पत्रकार आणि समाजसेवक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिभावंत व्यक्तींना गौरविण्यात येणार आहे. यावर्षीचा आदर्श समाजसेवक पुरस्कार श्री संतोष अच्युतराव पवार,आदर्श शिक्षिका पुरस्कार श्रीमती रंजना नाथराव जाधव, आदर्श समाजरक्षक पुरस्कार श्री मंगेश मारुती भोले,झिरो टू हिरो उद्योजकरत्न पुरस्कार श्री नरहरी राजेंद्र तपकिरे, आदर्श पत्रकार पुरस्कार श्री गोविंद राजाराम जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व महाराष्ट्राचे लाडके सुप्रसिद्ध मराठी अभिनेते मा.सुनील गोडबोले आवर्जून उपस्थित राहणार आहेत,त्याप्रसंगी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने यांचे व्याख्यान होणार आहे तसेच पुरस्कारार्थींच्या प्रेरणादायी कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे. समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी मनोहर अंबानगरितील सुजाण,सुसंकृत नागरिकांनी मोठ्या सख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोपानराव ढगे , उपाध्यक्ष जी.डी. बनसोडे तसेच सचिव मिलिंद ढगे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायत सरपंचपद आरक्षण सोडत कार्यक्रमाचे २५ मार्च रोजी आयोजन – तहसीलदार वैशाली पाटील



प्रतिनिधी । आष्टी

आष्टी तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सरपंचपदाचे आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तहसील कार्यालयामध्ये मंगळवार दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी केले आहे.

याविषयी अधिक माहिती देतांना त्यांनी दि. १७ मार्च रोजी प्रेस नोट जारी केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग, बीड जिल्हाधिकारी कार्यालय यांचे निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी, समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करता सरपंचपदासाठी सोडत पद्धतीने आरक्षण कार्यक्रम दि.२५ मार्च सकाळी ११ वा. आष्टी तहसील कार्यालय सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यातील आगामी १२५ ग्रामपंचायत सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम यामध्ये जाहीर होणार आहे. यावेळी तालुक्यातील सरपंच,

# 'अटर का पटर' कवितासंग्रहाला ज्ञानवर्धिनी साहित्य पुरस्कार

प्रतिनिधी । शिरूर कासार

येथील प्रसिद्ध बाल साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाला ज्ञानवर्धिनी राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला असून दि. १ एप्रिल रोजी साहित्यिक दि. बा.पाटील, सांगोलाचे आ. शहाजीबापू पाटील, माढाचे आ. अभिजित पाटील, शिक्षक आ. दत्तात्रय सावंत, आयुर्वेदाचार्य बाबुशेठ पांडकर या मान्यवरांच्या उपस्थितीत पंढरपूर येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



डॉ. विठ्ठल जाधव यांचे 'पांढरा कावळा' (बालकादंबरी) 'बटाटीची धार' (कथासंग्रह) उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे बालकविता संग्रहासह 'एकविसाव्या बाल शतकारंभीचे बालसाहित्य' हा महत्त्वाचा संशोधन ग्रंथ प्रकाशित आहे. 'अटर का पटर' हा बालकविता संग्रह महात्मा गांधी विद्यापीठामध्ये एम. ए. मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. महाराष्ट्र शासन आणि इतर नामांकित संस्थांचे अनेक पुरस्कार त्यांच्या साहित्यकृतीस लाभले आहेत.

मराठी साहित्य लेखकांना प्रेरणा देण्यासाठी गेल्या दहा वर्षापासून ज्ञानवर्धिनी पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी कुबेर (आबा) पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा उत्कृष्ट बालसाहित्य राज्य पुरस्कार साहित्यिक विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहास जाहीर झाला आहे. ज्ञानवर्धिनीचे संस्थापक सचिव राजेश पवार, साहित्यिक अंकुश गाजरे यांनी घोषित केले आहेत. स्मृतीचिन्ह, मानपत्र, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. जाधव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# इकरा इम्रान पठाण या चिमुकलीचा पहिला रोजा पूर्ण

प्रतिनिधी । पाटोदा

मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे पाटोदा येथील युवा नेतृत्व तथा दलित मित्र एकबाल पेंटर फाउंडेशन चे उपाध्यक्ष जुनेद (भैय्या) पठाण यांची लाडकी बहिण चिमुकली इकरा पठाण (वय ७ वर्षे) यांनी तिच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे.



# मुक्रमाबाद येथील कु.ऋतुजा हावगीराव खंकरे हिचे एम.बि. बि.एस.वैद्यकीय शिक्षण पूर्ण

प्रतिनिधी । मुक्रमाबाद

दिनांक: १८.०३.२०२५ रोज मंगळवार या दिवशी श्री छत्रपती संभाजी माध्यमिक विद्यालय मुक्रमाबाद येथील माजी विद्यार्थिनी कु.खंकरे ऋतुजा हावगीराव रा. मुक्रमाबाद. हिने वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून चइइड पदवी मिळवली आहे. त्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक श्री बालाजी भायेगावे सर यांनी शाल, श्रीफळ देऊन तिचा व तिच्या पालकांचा यथोचित सत्कार केला ..तसेच




आमच्या शाळेतील चार विद्यार्थिनींनी इढड (भारत टॅलेंट सर्च) परीक्षेत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची नावे १. मारमपल्ले मानवी २. गायकवाड आकांक्षा ३. लाळेकर अक्षरा ४. शिंदे श्वेता असून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले. या गौरव समारंभास शाळेचे सचिव श्री गजानन पाटील सर, श्रीनिवास पाटील सर व शाळेचे मुख्याध्यापक श्री बालाजी भायेगावे सर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# पैशाचा पाऊस पाडण्यासाठी विधी नाडे गावात नरबळीची शक्यता

प्रतिनिधी । गडब

पेण तालुक्यातील नाहे गावात नुकताच पैशाचा पाऊस पाडण्याचा निधी घडला होता. या विधी दरम्यान एका माणसाची नरबळी देण्याची शक्यता होती ज्यामुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ही तिहेरी (कायद्याची, पोलिसांची आणि जादूटोणा) भीती होती. या भीतीच्या वातावरणातून गावकन्याना मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पेण शाखेने शुक्रवारी (दि. १४) नाडे गावात दोन तासाचे व्याख्यान आयोजित केले होते.बाचेळी ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. तसेच, त्यांना कायदेविषयक सखोल माहिती देण्यात आली.व्याख्यानाच्या सुरुवातीला नितीन निकम यांनी महा, अंनिसची भूमिका आणि कार्य याबद्दलमाहिती सांगितली. त्यांनी सांगितले की, महा. अंनिस समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करते आणि हे कार्य सर्वसामान्य जनतेसाठी अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मांत्रिक, भगतांचा प्रत्यक्षिकासह भांडाफोड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१०४
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- २८/०२/२०२५

अर्जदार श्री./ :- आनंद नामदेव वाघमारे प्रकरण :- सर्व्हे नं.३३सि टी सर्व्हे नं.२९९३ सहान प्लॉट नं.१८ न.प.मि.नं.१८-१५१-१८ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नं.१४
पश्चिम :- ०६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट नं.१९
उत्तर :- प्लॉट नं.१७ व १६

मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई
ई-निविदा सुचना क्रमांक - एबीजे/१० सन २०२४-२५
शुध्दीपत्रक क्रमांक - ३

उपरोक्त विभाग सुचनेतील कामांच्या निविदा प्रक्रियेच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा उपलब्ध व स्विकृती अंतिम दिनांक | - | दि.२१/०३/२०२५ (वेळ १८.५५ वाजेपर्यंत) |
| २. | ई-निविदा उघडण्याचा दिनांक | - | दि.२४/०३/२०२५ (वेळ ११.०० वाजेपासुन पुढे) |

टिप : १. वरील निविदा सुचनेमध्ये ०३ कामे आहेत, व या निविदेप्रक्रियेची संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

www.mahapwd.com
https:/mahatenders.gov.in

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# औरंगजेबाची कबर हटवणे सोपा विषय

## त्यात दंगल करायचे कारण काय, केंद्राकडे ते थडगे काढण्याची मागणी करा - उद्धव ठाकरे

प्रतिनिधी । नागपुर

नागपूर दंगलीवरून उद्धव ठाकरे यांनी आज महायुती सरकारवर जोरदार हल्ला चढवला. थडगे काढण्यासाठी आंदोलने करण्यापेक्षा केंद्र सरकारकडे जाऊन औरंगजेबाचे थडगे काढण्याची मागणी करा, असा सल्ला उद्धव ठाकरे यांनी सरकारला दिला. औरंगजेबाच्या कबरीला केंद्र सरकार संरक्षण देतेय, तर मग औरंगजेब तुमचा कोण लागतो. नागपूरची घटना पूर्वनियोजित असेल, तर तुमचे गृह खाते झोपा काढत होते का? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, गुजरातमध्ये जन्मलेला औरंगजेब छत्रपती शिवाजी महाराजांनी संघर्ष करून बलाढ्य सत्तेला नमवून जे हिंदवी स्वराज्य स्थापन केले होते, त्या स्वराज्यावर महाराजांच्या निधनानंतर चालून आला होता. औरंगजेब महाराष्ट्र जिंकायला आला होता, पण महाराष्ट्राच्या मातीचा एक कणही जिंकू शकला नाही. महाराजांपासून स्फूर्ती आणि प्रेरणा घेतलेल्या असंख्य मावळ्यांनी त्याला मूठमाती दिली. अशा औरंगजेबाचे समर्थन कोणीही शिवप्रेमी करणार नाही. त्यामुळे कोणी त्याचे थडगे काढण्याची भाषा करत असेल, तर बोलणे आणि आंदोलन करण्यापेक्षा डबल इंजिन सरकार नुसते वाफा सोडतेय का?

कबर हटवणे सोपा विषय, त्यात दंगल करायचे कारण काय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औरंगजेबाची कबर उघडण्यामध्ये असमर्थता दाखवली आहे. त्या कबरीला केंद्राचे



संरक्षण आहे. केंद्र सरकार औरंगजेबाच्या थडग्याला संरक्षण देणार असेल, तर मग केंद्र सरकार किंवा भाजपला आम्ही विचारतोय की, तो औरंगजेब तुमचा कोण लागतो. औरंगजेब असो, अफज़ल खान असो, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे पुरावे आहेत. ते नष्ट करायचे असेल, आंदोलन काय करताय? तुम्ही केंद्र सरकारकडे जा, मोदींकडे जा आणि त्यांना म्हणा की, गुजरातमध्ये जन्माला आलेला औरंगजेब ज्याला महाराष्ट्राने मुठमाती दिली. त्याची कबर तुम्ही उद्ध्वस्त करा. कबर उखडण्याचा जेव्हा सोहळा कराल, तेव्हा चंद्राबाबू आणि नीतेश कुमारांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवा. औरंगजेबाची कबर हटवणे सोपा विषय आहे. त्यात दंगल करायचे कारण काय? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

...तर गृह खाते झोपा काढत होते का?

गृहमंत्र्यांचे घर आणि आरएसएसचे मुख्य कार्यालय हे नागपूर आहे. अशा नागपूरमध्ये हिंदू खतरे में कसा काय? मग इतके वर्ष तुम्ही नेमके केले काय? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. नागपूरची घटना पूर्वनियोजित असेल, तर तुमचे गृह खाते झोपा काढत होते का? हा पूर्वनियोजित कट तुमच्या कानावर आला कसा नाही? जर आला असेल, तर तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष केले का? अशी प्रश्नांची सरबत्ती उद्धव ठाकरे यांनी सरकारवर केली.

आधी झेंड्यातील हिरवा रंग काढा, मग हिंदू-मुस्लिम करा

सरकार आपले अपयश लपवण्याचा प्रयत्न करत आहे. हे अपयश लपवण्यामध्ये आणखी अपयशी ठरत आहे. भाजपला प्रश्न विचारायचा आहे. तुमचे हिंदुत्व आणि हिंदुत्वाचे ढोंग आम्ही पाहिलेले आहे. तुम्हाला हिरव्या रंगाचा एवढा राग असेल, तर प्रथम तुमच्या झेंड्यावरचा हिरवा काढून दाखवा, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी भाजपला दिले. भाजपने आधी पक्षाच्या झेंड्यातील हिरवा रंग काढावा, मग हिंदू-मुस्लिम करावे, असा टोला ठाकरे यांनी लगावला.

# पीएसआय बोंबाळे यांची सेवानिवृत्ती



## एएसपी पांडकर यांनी केला सत्कार

बीड (प्रतिनिधी):

येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस उप निरीक्षक भीमराव यादवराव बोंबाळे हे नियत वयोमानानुसार २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत बोंबाळे यांना सपत्नीक गौरविण्यात आले.

बोंबाळे यांनी चकलांबा, केज, बीड शहर, माजलगाव, पिंपळनेर आणि शिवाजीनगर आदी पोलिस ठाण्यात ३७ वर्ष पूर्ण सेवा केली. आपल्या पोलिस खात्यातील सेवेच्या काळात त्यांना विविध बक्षीस मिळविले. त्यांनी अत्यंत प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आणि अधिकारी म्हणून कार्य केले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे विश्वासू म्हणून सुपरीचित् आहेत.

अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे, पोलीस निरीक्षक संतोष साबळे आदींच्या उपस्थितीत बोंबाळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

# बनसोडे हत्याप्रकरणी ६ जणांना ७ दिवस कोठडी

चार आरोपी फरार, १० जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । बीड

आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील ट्रकचालक विकास बनसोडे याचा मुलीच्या प्रेमसंबंधाच्या कारणावरून हत्या करण्यात आली होती. या हत्येप्रकरणी आष्टी पोलिसांनी तरुणाच्या भावाच्या तक्रारीवरून दहा जणांवर खुनासह ट्रॉसिटी क्टप्रमाणे गुन्हा दाखल केला. सहा जणांना अटक केल्यानंतर त्यांना सोमवारी दुपारी आष्टी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने २४ मार्चपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या हत्या प्रकरणातील अन्य चार आरोपी अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.



पिंपरी घुमरी येथील भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर चालक म्हणून विकास बनसोडे (२३) हा सात वर्षांपासून काम करत होता. मुलीशी त्याचे प्रेम संबध निर्माण झाल्याचा संशय आल्याने विकास याला भाऊसाहेब याने कामावरून काढून टाकले होते. १२ मार्च रोजी विकास बनसोडे व मित्र प्रकाश साळवे (रा. रजाळा, ता. भोकरदन) हे दोघे पिंपरी घुमरी गावात शनिवारी आले होते.

अशी आरोपींची नावे

भाऊसाहेब भानुदास क्षीरसागर, स्वाती भाऊसाहेब क्षीरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर, संकेत भाऊसाहेब क्षीरसागर (रा. पिंपरी घुमरी, ता. आष्टी), सुशांत शिंदे, संजय भवर अशा सहा जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यांना सोमवारी दुपारी आष्टी येथील न्यायालयासमोर हजर केले होते. हत्या प्रकरणातील संभाजी झांबरे, सचिन भवर, बाबासाहेब क्षीरसागर, बापूराव शिंदे हे फरार आहेत.

# औरंगजेबाची कबर देशाच्या बाहेर फेकली पाहिजे:उदयनराजे भोसलेंची मागणी

## नागपूर हिंसाचारावरून काँग्रेसवर केले गंभीर आरोप

प्रतिनिधी । सातारा

दंगलीत दगड भरलेले ट्रक आले कुठून हे विचारण्यापेक्षा ही विकृती ठेचून कशी काढता येईल हे बघा, असे उदयनराजे भोसले म्हणाले. काँग्रेसच्या काळात अनेक दंगली झाल्या. त्याला मोठ्या प्रमाणावर आळा घालण्याचे काम भाजप सरकारने केले. काँग्रेसने द्वेष पसरवण्याचे काम केले, असा आरोपही उदयनराजे भोसले यांनी केला. औरंगजेबाची कबर काढली, तर ती या देशाच्या बाहेरच फेकून दिली पाहिजे, असेही ते म्हणाले.

औरंगजेब कबरीच्या वादावरून सोमवारी रात्री ८:३० वाजता नागपूरच्या महाल परिसरात हिंसाचार उसळला. विश्व हिंदू परिषदेने मुघल सम्राट औरंगजेबाचा पुतळा जाळला आणि त्याची कबर पाडण्याची मागणी केली. यानंतर दगडफेक आणि तोडफोड सुरू झाली. दंगलखोरांनी घरांवर दगडफेक केली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या वाहनांना आग



लावली. पोलिसांवरही हल्ला झाला. यामध्ये अनेक पोलिस कर्मचारी जखमी झालेत. या हिंसाचारावर आता विविध राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहे. यावर उदयनराजे भोसले यांनीही प्रतिक्रिया देत औरंगजेबाची कबर देशाच्या बाहेर फेकून देण्याची मागणी केली. तसेच दंगलीवरून काँग्रेसवर मोठा आरोप केला.

नेमके काय म्हणाले उदयनराजे भोसले?

छत्रपती शिवाजी महाराज असे राजे होऊन गेले ज्यांनी सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. राज्यकारभारात लोकांचा सहभाग असावा हा दुसरा विचार. लोकशाहीचा ढाचा रचण्याचे काम छत्रपती शिवरायांनी केले. त्यांची तुलना कोणासोबतही होऊ शकत नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणण्याचे काम मोदीजींनी केले. ही मूठभर लोकं जी व्यक्तीकेंद्रीत असतात, वैयक्तिक स्वार्थाने पेटून उठलेल्या असतात त्यांची कुठलीही जात-पात नसते. अशा लोकांना ठेचण्याचे काम समाजाने केले पाहिजे. शिवाजी महाराजांचा शासनमान्य इतिहास प्रसिद्ध करावा. शिवाजी महाराजांचा विचार देशाला अखंड ठेवू शकतो, अशी प्रतिक्रिया उदयनराजे भोसले यांनी दिली.

# नाग जातीच्या नर-मादी सापांची दोन तास प्रणयक्रीडा!

## रस्त्याच्या बाजूचे हे विहंगम दृश्य; सौताडा येथील दुर्मिळ घटना

प्रतिनिधी । पाटोदा

निसर्गाची अद्भुत किमया अनेक प्रसंग आणि घटनांच्या माध्यमातून अनेक वेळा पाहायला भेटते.. असाच एक प्रसंग साप जातीच्या दोन पशु मधील प्रणय क्रीडाच्या संदर्भात घडल्याचा दुर्मिळ प्रसंग काल दुपारी घडून आला आहे.बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र सौताडा येथील पत्रकार संजय सानप यांच्या निवासस्थानाच्या समोर रस्त्याच्या बाजूलाच सहा ते सात फूट लांबी असलेले दोन नाग जातीचे साप नर आणि मादी प्रणय क्रीडेत एवढे रमून गेले की, रस्त्यांनी येणाऱ्या जाणाऱ्या अनेक व्यक्तींनी पाहिल्यानंतर ही ते अजिबात घाबरून पळून जात नव्हते.या प्रसंगाचा आखो देखा हाल पत्रकार संजय सानप यांनी आपल्या कॅमेर्यात कैद केला! अर्धा तासाचा हा व्हिडिओ माध्यमांमध्ये टाकल्यानंतर अनेकांनी तो पाहिला. निसर्गाच्या अद्भुत किमयाची ही साक्ष असल्याचे स्पष्ट झाले.मुळातच पशु पक्षी आणि प्राण्यांची आवड प्रेम आणि दया असलेले पत्रकार संजय सानप यांनी त्या दोन्हींना कसलाही त्रास न होऊ देता सर्प मित्रांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु दुर्दैवाने तो होऊ शकला नाही. एक दीड तासापेक्षाही अधिक या दोन नर-मादीसापामधील हा प्रसंग पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली. या घटनेच्या माध्यमातून मात्र निसर्गाने मनुष्य जातीप्रमाणे इतर प्रत्येक पशु पक्षी प्राण्यांमध्ये एक नियम आणि शिस्त लावून दिलेली असल्याचे निसर्गप्रेमींनी सांगितले.

पशु पक्षी प्राणी हे फार मोठी मनुष्य समाजाची उपलब्धता आहे. आपला देश शेतीप्रधान आहे आणि अशा पशु पक्षी प्राण्यांना शेतकऱ्यांचा मित्रही म्हटले जाते. त्या दृष्टीने प्राणीमात्रावर दया आणि संवर्धन



करण्याच्या हेतूने शासनाने विशेष अशी काळजी घेऊन नवीन नियम तयार करावेत अशा भावना यानिमित्ताने व्यक्त झाल्या

# सहकार मंत्रालयाच्या केंद्रीय निबंधकांविरुद्ध तक्रार

मी, खाली सही करणारा, जिजाऊ माहासाहेब मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेचा ठेवीदार आहे. दुर्दैवाने, सदर क्रेडिट सोसायटी बंद झाली असून अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे (ऋखठ दाखल) मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अधिनियम, २००२ अंतर्गत.

मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अधिनियम, २००२ च्या कलम ८५- नुसार मी सहकारी लोकपाल यांच्याकडे अर्ज केला होता, परंतु मर्यादित कालावधीत कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे मी सहकार मंत्रालयाच्या केंद्रीय निबंधकांकडे अपील दाखल केले.

तथापि, केंद्रीय निबंधकांनी आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यास विलंब केला आहे. या निष्क्रीयतेमुळे आम्हा ठेवीदारांचे आर्थिक नुकसान होत आहे.त्यामुळे आपल्याला नम्र विनंती आहे की, सहकार मंत्रालयाच्या केंद्रीय निबंधकांना त्वरित निर्देश द्यावेत आणि खालील उपाययोजना कराव्यात:

१. जिजाऊ माहासाहेब मल्टिस्टेट को-



ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीसाठी लिक्विडेटर नियुक्त करावा.

२. माझी ठेवीची रक्कम व्याजासह परत मिळावी यासाठी आवश्यक ती कारवाई करावी.

मी आपल्याला आग्रहाची विनंती करतो की, ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तातडीने कारवाई करावी.

# शिरूर पोलिसांनी बुलेटचालकांचा 'फाटफाट' आवाज काढला

प्रतिनिधी । पुणे

कर्णकश आवाज काढत फटाक्यांसारखा मात्र, कानठाळ्या बसविणाऱ्या त्या बुलेटस्वारांवर शिरूर वाहतूक पोलिसांनी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनात धडक कारवाई सुरू केली असून, वेगवेगळ्या भागात कारवाई करून जप्त केलेल्या ३५ सायलेन्सरवर बुलडोझर चालविला आहे.पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांनी कौतूक केले असून, यापुढे ही अशी कारवाई सुरुच राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी सांगितले .त्या अनुशंगाने वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार राजेंद्र वाघमोडे, महिला पोलीस हवालदार भाग्यश्री जाधव, पोलीस अंमलदार विरेंद्र सुंभे, पोलीस अंमलदार शेखर झाडबुके, पोलीस अंमलदार आप्पासाहेब कदम, पोलीस अंमलदार ज्ञानदेव गोरे, पोलीस अंमलदार विकी मैंद यांचे पथक तयार केले.शहरात रात्री-अपरात्री भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. त्यांच्या दुचाकीचा वेग देखील भरधाव असतो. तर गाडीच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करून त्यातून फटाक्यासारखा आवाज काढला जातो. या फटाक्यासारख्या आवाजाने ज्येष्ठ नागरिकांसह सर्व सामान्य नागरिकांना त्रास होतो. अचानक आवाज आल्यानंतर लहान मुल, महिला व ज्येष्ठ नागरिक घाबरतात देखील. परंतु, त्याचीच मजा घेत हे तरुण शहरात सुसाट सुटलेले पाहायला मिळतात. पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसांनी शहरातील कॉलेज, बस स्टॅन्ड, गर्दीच्या ठिकाणी बुलेटचालकांवर कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त केले.त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या ३५ सायलेन्सरवर 'बुलडोझर' चालवून नष्ट केले. शिरूर पोलीस स्टेशन शहर व ग्रामीण भागामधील चार चाकी वाहनांचे काळया काचांचे फिल्मींग असल्यावर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून गाडीच्या काचेचे

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

प्रतिनिधी । बीड

आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती.



अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.